''महाराष्ट्रातील लघुउद्योगांचे विकेंद्रीकरण आवश्यक''

प्रा. दीपक ताटपुजे

लघुउद्योग हा व्यापक क्षेत्रांशी निगडीत असल्यानेच विविध क्षेत्रात या प्रकारच्या उद्योगांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मध्यम आणि मोठ्या उद्योगांची पायाभरणी हीच लघुउद्योगांची मोठी जमेची बाजू आह. इ.स. १९५० मध्ये आपल्या देशातील फक्त १६ हजार लघुउद्योगांचीा ही संख्या आज अखेर (१९९७) २७ लाख ३० हजार पर्यंत पोचली आहे. लघुउद्योग वाढ आणि निष्कर्ष यांचा आढावा घेणारा हा लेख.....

आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्व आणि त्यानंतर इ.स. १९७० पर्यंत चालणाऱ्या लघुउद्योगांचीा पारंपारिक जडणघडण मर्यादीत स्वरूपाची होती. प्रत्येक देशाच्या अर्थकारणामध्ये महत्वाची भुमिका बजावणाऱ्या लघुउद्योगांवर अधिकाअधिक लक्ष केंद्रीत केल्यानंतर इ.स. १९८० मध्ये ८ लाख ७५ हजार लघुउद्योग कार्यरत झाले. अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी यानंतरच्या काळात लघुउद्योग हे अग्रक्रमाने विकसित करण्याचेच धोरण प्रामुख्याने दिसून येते.

लघुउद्योग हा आपल्या देशात कोणत्याही प्रकारच्या औद्योगिक क्रांतीमधुन आलेला नसुन तो अनादी काळापासूनच बारा बलुतेदारांच्या पध्दतीने यापूर्वीच रूजलेला होता. काळानुसार जाती-व्यवस्था, अर्थव्यवस्थेतील बदल, उद्योगाकडे बघण्याचा दृष्टीकोन यामुळे लघुउद्योग संकल्पनेमध्ये अनेक स्थित्यंतरेही झाली. तरी सुध्दा मोठ्या उद्योगांप्रमाणे या लघुउद्योगांनी समाजव्यवस्थेत आर्थिक असंतुलन निर्माण केलेले नाही.

मोठ्या उद्योगांच्या बाबतीतील बदलत्या धोरणांमुळे मात्र लघुउद्योगांवर झालेला परिणाम गेल्या पन्नास वर्षाच्या काळात या लघुउद्योगाच्याा विकासाची गती राखू शकलेला नाही.

पारंपारीक उद्योगांमध्ये काळानुरूप बदल होत गेलेल्या काही विशिष्ठ लघुउद्योगांचा त्या त्या क्षेत्रावरचाा पगडा मात्र बराच आजही कायम आहे. (तक्ता क्र. १ पहावा) सोलापूरच्या चादरी, कोल्हापुरी चप्पल, सातारी कंदी पेठे, पेण-पनवेलच्या गणेश-मुर्ती, वेगुर्लेचे काजू, कापड उद्योगासाठी इचलकरंजी किंवा भिवंडी, लाखेसाठी भंडारा आदी प्रकारचे एकूण १३८ लघुउद्योग त्या त्या क्षेत्राशीच व परिसराशी निगडीत विकास साधू शकले आहेत. पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापुर यांसारखीच काही शहरे होऊ शकली आहे. मात्र त्यामुळे शहरांच्या औद्योगिकीकरणाच्या अनेक नवीन समस्या उभ्या राहू लागल्या आहेत.

विशिष्ठ प्रकारच्या उत्पादन राज्याच्या एकाच विशिष्ठ ठिकाणी उत्पादीत होऊन अन्य ठिकाणी वितरीत होत असताना त्या उत्पादनाचा होणारा वाहतुक खर्च, नाशवंत मालासाठीची उपाय योजना, वेळेत मालाची होऊ न शकणारी उपलब्धता, उत्पादनाची वाढणारी एकूण किंमत यासाठी या प्रकारच्या किंवा अन्य लघुउद्योगांचे राज्यामध्ये विविध ठिकाणीा स्थानिक गरजेनुसार विकेंद्रीकरण होणे राज्याच्या एकूण औद्योगिक विकास प्रक्रियेच्या दृष्टीने अतिशय आवश्यक बाब ठरली आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या उद्योगांची उभारणी करण्यासाठी उद्योजकानो योग्य नियोजन करून अशा उद्योगांची वैशिष्ट्ये, तांत्रिक साधन सामुग्री, उपभोक्ता वर्ग यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

अशा अथवा अन्य लघुउद्योगांसाठी शासनाने धोरण हे पूर्णतः प्रोत्साहनात्मकच आहे. मात्र असे व अन्य कोणतेही उद्योग शासन संरक्षित (उद्योग यशस्वीतेसाठी) करत नाही ही महत्वाची गोष्ट उद्योजकाने ध्यानात ठेवली पाहिजे.

आपल्याा महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिकीकरण्याचा विकासामध्ये लघु-उद्योगांची वाढ ही मध्यम उद्योग आणि मोठ्या उद्योगांच्या प्रमाणात समाधानकारक असून त्यामुळे रोजगार निर्मितीलाही मोठा हातभार लागला आहे. मात्र एकूण लघुउद्योगांच्या २.३ टक्के एवढ्याच उद्योगांमधुन प्रत्येक उद्योगात ५०० हून अधिक कामगार कार्यरत आहेत. तसेच एकूण लघुउद्योगांच्या ५३.८ टक्के उद्योगांमधुन प्रत्येकी २० पेक्षा कमी कामगार कार्यरत आहेत. हा एकूण फरक लक्षात घेता रोजगार निर्मितीक्षम उद्योग आपल्या राज्यात कमी प्रमाणात काढले गेले आहेत.

आपल्या राज्यात १९९३-९४ मध्ये असणारी एकूण लघुउद्योगांची संख्या ९७६८ होती. तीच संख्या १९९६-९७ अखेर २,०३,८८२ वर पोचली आहे. याच लघुउद्योगांच्या वाढीमुळे १६.३ लाख लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे आणि याच वाढीमुळे भांडवली गुंतवणुक ९७१५ करोड एवढी शक्य झाली आहे.

आपल्या राज्याबरोबर देशामध्ये लघुउद्योगांच्या संख्येत ८ लाख ७५ हजार (१९८०) या संख्येवरून २७ लाख ३० हजार (१९९७) एवढी वाढ झाली असली तरी एकूण लोकसंख्येच्या मानाने ही वाढ मर्यादीतच आहे.

आपले राज्य महाराष्ट्र हे औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्य मानले जाते. उद्योगांच्या कार्यक्षम वाढीची तुलना ही एकूण कायम भांडवलातील वाढ, उत्पादन भांडवलातील वाढ, कामगार-मजुरीतील वाढ आणि उपलब्ध साधन सामुग्रीतील वाढ यांच्या प्रमाणात मोजली जाते. महाराष्ट्र राज्य मात्र या चारही बाबतीत आपल्या देशाच्या प्रगतीशी तुलना करता जास्त कार्यक्षम आहे. त्यामुळे आजही महाराष्ट्रात लघुउद्योग वाढीसाठी पोषक वातावरण आहे. त्याचा फायदा उद्योजकांनी घेणे आवश्यक आहे. उद्योजकांनी कोणत्या राज्याचा परिसर निवडावा यासाठी अशा माहितीचा पुरक म्हणून योग्य वापर करणे ठिकाण-निवडीसाठी आवश्यक ठरते.

एखाद्या विशिष्ठ परिसरातील केंद्रीत उद्योग, राज्यातील उद्योगांची वाढ व त्यामुळे निर्माण होणारी स्पर्धा, रोजगारक्षम उद्योगांमुळे विशिष्ठा परिसरातील व्यक्तींना कामासाठी जास्त द्यावी लागणारी किंमत आणि त्यामुळे उत्पादनाची वाढणारी किंमत अशा महत्वाच्या उद्योजकीय निर्णयांसाठी सदर लेखातील माहिती ही उद्योजकास उपयोगी पडेल अशा विश्वास वाटतो.

(टिप : या लेखात दोन आलेख आणि एक तक्ता समाविष्ट आहे.)

तक्ता क्र. १

परिसर	वैशिष्ट्यपूर्ण उद्योग
पुणे	ऑटोमोबाईल उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स, खाद्य-प्रक्रिया
मुंबई-वाशी	इलेक्ट्रॉनिक्स, तयार कपडे, केमिकल
सोलापूर	चादरी, कुंकु
भंडारा	ब्रास धातु उपकरणे, लाख
पेण-पनवेल	गणेशमुर्ती
कोल्हापुर	फौंड्री, चप्पल, डिझेल इंजिन्स्
वेंगुर्ला	काजु
इचलकरंजी, भिवंडी	पॉवरलुम्स्
पैठण	साडी
नागपुर	साडी पॉवर-लुम्स्